पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्या वैद्यकीय महाविद्यालय, अहमदनगर या खाजगी वैद्यकीय प्रशिक्षण संस्थेस प्राथमिक आरोग्य केंद्रातील खाटा शैक्षणिक प्रयोजनार्थ अनुभवासाठी वापरण्यास परवानगी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकिर्ण - २०१५ /प्र.क्र. २८५ /आरोग्य-३
१० वा मजला, संकुल इमारत,
गो.ते.रुग्णालय, मुंबई-४०० ००१.
तारीख: ०२ नोव्हेंबर,२०१७

वाचा -

1) **शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग,क्रमांक-एचएसजी १६९०/प्र.क्र.९६/आरोग्य-३, दिनांक- ०३.०८.१९९०.**
2) **शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग,क्रमांक-संकिर्ण २०१३/प्र.क्र.३०७/आरोग्य-३, दिनांक- ०३.०८.२०१३.**
3) **आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक- संआसे/कक्ष-७ अ/टे-७/प्राआकें /प्रशिक्षण /न.क्र.९२/२०१५/२३६४-६८, दिनांक-२३.०७.२०१५**

शासन निर्णय-

उपरोक्त अ.क्र.२ येथील शासन निर्णयान्वये पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनचे वैद्यकीय महाविद्यालय, अहमदनगर या खाजगी वैद्यकीय प्रशिक्षण संस्थेस ग्रामिण अनुभवाकरीता जेऊर बायजाबाई, वाळकी, देहरे व मेहेकरी ता.जि.अहमदनगर येथील प्राथमिक आरोग्य केंद्र संलग्नित करण्यास प्रतिदिन प्रतिखाट रुपये १५०/- इतक्या दराने खालील विहित अटी व शर्तीच्या अधीन राहून पुढील ३ वर्षाकरीता वापरण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे:-

1) खाटांसाठी आकारावयाचे शुल्क रुपये १५०/- प्रतिदिन प्रतिखाटा याप्रमाणे संस्था दर तिमाहीच्या पहिल्या महिन्याच्या पहिल्या आठवडयात,तीन महिन्याच्या कालावधीसाठी अग्रिम स्वरुपात चुकते करील. खाटा वापरण्याच्या कालावधीत शासन ठरविल ते सुधारीत शुल्क त्या दिनांकापासून चुकते करण्याचे संस्थेवर बंधनकारक राहिल. तसे न केल्यास ही व्यवस्था रद्द करण्यात येईल व याबाबतचा शासनाचा निर्णय अंतिम राहिल.

२) उपरोक्त दिनांक ०३.०८.१९९० येथील शासन निर्णयासोबत जोडलेल्या करारपत्राच्या विहित नमून्याप्रमाणे संस्थेने उपसंचालक, आरोग्य सेवा नाशिक यांचे समवेत करारपत्र करुन ते नोंदणीकृत करुन घ्यावे व या करारपत्रातील कोणत्याही अटींचे पालन न केल्यास किंवा अटीचा भंग झाल्यास ही व्यवस्था रद्द करण्यात येईलव याबाबतचा शासनाचा निर्णय अंतिम असेल.

३) या संदर्भात सार्वजनिक आरोग्य विभाग आणि वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग ह्यांनी वेळोवेळी निर्देशीत केल्याप्रमाणे अन्य अटी व शर्तींचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहिल.

३. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, अहमदनगर यांनी विहित अटी व शर्तींच्या अधिन राहून संबंधीत संस्थेकडून करारपत्र तसेच प्रशासकीय बाबी पूर्ण करून घ्याव्यात व नंतरच पुढील कालावधीसाठी खाटांचा वापर करण्यास परवानगी द्यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७११०११५५७३९८७१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Roshani Dinesh Kadam Patil

Digitally signed by Roshani Dinesh Kadam Patil
DN: CN = Roshani Dinesh Kadam Patil, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2017.11.02 15:56:16 +05'30'

रो.दि.कदम-पाटील
अवरसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा परिक्षा) (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई नागपूर
२. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
३. सहसंचालक,आरोग्य सेवा (रुग्णालये - राज्यस्तर), मुंबई.
४. सहसंचालक,आरोग्य सेवा (प्राआकेंद्र- जिपस्तर), मुंबई.
५. सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन) पुणे.
६. उपसंचालक, आरोग्य सेवा, नाशिक मंडळ, नाशिक.

७. जिल्हा शल्य चिकित्सक, अहमदनगर.
८. जिल्हा कोषागार अधिकारी, अहमदनगर.
९. वित्त विभाग (व्यय-१३), मंत्रालय, मुंबई.
१०. प्राचार्य, पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनचे वैद्यकीय महाविद्यालय, अहमदनगर
११. निवडनस्ती (आरोग्य-३)